# वेदांता लिमिटेड

# मंडळ विविधता धोरण

| | |
|---|---|
| दस्तऐवजाचे नाव | **मंडळ विविधता धोरण** |
| कंपनी | **वेदांता लिमिटेड** |
| शेवटचे आद्यतन | **04-ऑगस्ट-2023** |
| आवृत्ती मंजुरकर्ता | **वेदांता लिमिटेडचे संचालक मंडळ** |
| लागू होण्याची तारीख | **04-ऑगस्ट-23** |



Sensitivity: Public (C4)

# वेदांता लिमिटेड

## मंडळ विविधता धोरण

---

### 1. उद्देश

या मंडळ विविधता धोरणाचा उद्देश वेदांता लिमिटेड ("मंडळ") च्या संचालक मंडळाचे सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण सदस्यत्व सुनिश्चित करणे हा आहे ज्यामुळे इष्टतम निर्णय घेणे आणि वेदांता लिमिटेडच्या (वेदांता) भागधारकांच्या सामूहिक फायद्यासाठी यशास प्रोत्साहन देणारी धोरण विकसित आणि अंमलबजावणीमध्ये मदत करणे.

संस्थेमध्येआणि ज्यांच्याशी आम्ही भागीदारीत आहोत अशा मोठ्या समुदायांमध्ये विविधता आणि समावेशनाला प्रोत्साहन देण्यास वेदांता वचनबद्ध आहे. आमच्या मंडळापासून सुरुवात करत सगळ्या पातळ्यांवर लिंगभाव समानता साध्य करणे आमचे उद्दिष्ट आहे.

### 2. व्याप्ती

मंडळ विविधता धोरण फक्त वेदांता लिमिटेड मंडळाला लागू आहे पण विविधता आणि समावेशनाच्या वेदांताची व्यापक बांधिलकी निश्चित करण्याऱ्या वेदांता व्यवसाय आचारसंहिता आणि संबंधित धोरणांना प्रेरित करते. विविधता आणि समावेशनाशी संबंधित आमच्या पद्धती, उपक्रम आणि संतुलन याविषयीचा इतर तपशील कंपनीच्या वार्षिक अहवालात दिला आहे.

### 3. धोरण विधान

- मंडळाच्या सदस्यत्वात कौशल्य, व्यावसायिक व औद्योगिक पार्श्वभूमी, वय, लैंगिक प्रवृत्ती, शारिरीक अपगंत्व, कौटुंबिक स्थिती, राष्ट्रीयत्व, बौगोलिक अनुभव व तज्ज्ञता, लिंग, कार्यकाळ, वांशिकता आणि विचारांतील विविधता यांचा समावेश असणे अतिशय महत्त्वाचे आहे;
- वैविध्यपूर्ण मंडळात कौशल्ये, ज्ञान, उद्योग अनुभव, पार्श्वभूमी, वंश, लिंग, आणि व्यक्तिविशिष्ट सदस्यांच्या इतर गुणांमधील भिन्नतेचा समावेश असेल आणि त्याचा चांगला उपयोग केला जाईल. त्याची निर्णयक्षमता सुधारण्यासाठी आणि कंपनीच्या भागधारकांना फायदा होण्यासाठी यात अनेक विचार, अंतर्दृष्टी, दृष्टीकोन आणि मतांची व्यापक श्रेणी असेल.

### 4. नामांकन आणि मानधन समिती

मंडलात कौशल्ये, अनुभव आणि ज्ञान यांचे योग्य संतुलन असल्याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी नामांकन समितीची आहे आणि त्याच्या मापदंड व उद्दिष्टांनुसार:

- मंडळाची रचना, वारसाहक्क नियोजन, प्रतिभा विकास आणि विविधतेच्या व्यापक पैलूंचे नियमितपणे पुनरावलोकन करेल.
- गुणवत्ता लक्षात घेऊन नियुक्तीसाठी योग्य उमेदवार शोधेल
    - आपल्या भागधारकांच्या फायद्यासाठी वेदांताच्या यशाला चालना देण्यासाठी विविधतेचे फायदे
    - मंडळाच्या विद्यमान सदस्यांची कौशल्ये, अनुभव, पार्श्वभूमी, स्वातंत्र्य आणि तज्ज्ञता



Sensitivity: Public (C4)

कंपनीची घटना, कंपनी कायदा, 2013 आणि सेबी सूची नियमांच्या आवश्यकतांनुसार मंडलात कार्यकारी, गैर-कार्यकारी आणि स्वतंत्र संचालकांचे इष्टतम संयोजन असेल. कंपनी कायदा, 2013 आणि सूची कराराच्या आवश्यकातांनुसार धोरण आणि इतर तपशीलांचे आवश्यक खुलासे केले जावे. कंपनीच्या संकेतस्थळावर धोरण उपलब्ध केले जाईल.

## 4. <u>जबाबदारी व पुनरावलोकन</u>

मंडळ नामांकन व मानधन समिती या धोरणाचे प्रत्येक दोन वर्षांनी पुनरावलोकन करेल आणि आवश्यक वाटल्यास योग्य त्या सुधारणा करण्याची शिफारस मंडळाला करेल.

प्रत्येक वेदांता व्यवसाय या धोरणाची अंमलबजावणी करेल.

स्वाक्षरी: संचालक/ मुख्य कार्यकारी अधिकारी, वेदांता लिमिटेड

दिनांक: ऑगस्ट 04, 2023



Sensitivity: Public (C4)